# ५३) यशाचे गमक.

मोगल बादशाहाच्या वजीराने नादिरशाह चाल करून येत असल्याची बातमी दिली. त्याचा सामना करण्याची क्षमता आपल्या सैन्यात नाही, हेही त्याने निःसंदिग्ध शब्दात सांगितले. नादिरशाह दिल्लीची लूट वा नाश करील, त्यापेक्षा तह करावा, असे वजीराचे म्हणणे होते. नादिरशाहला अभिप्रेत असणारी लूट, नजराण्याच्या रुपात दिली तर त्याला हवे ते मिळेल. शिवाय आपली जानहानी आणि वित्तहानी टळेल, असे सांगून वजीराने भारदस्त नजराण्याची भलावण केली. भोगविलास आणि ऐशआरामास जीवन मानणाऱ्या बादशाहला तो सल्ला पटला. त्याने दिल्लीच्या सीमेवर नादिरशाहशी युद्ध करायचे टाळून त्याचे थाटात स्वागत केले.

नादिरशाहच्या स्वागत समारोहासाठी खास दरबार भरवण्यात आला. दरबारात मोगल बादशाह आणि नादिरशाह यांचे सिंहासन एका ओळीत मांडण्यात आले. भयग्रस्त बादशाह मौल्यवान वस्त्राभूषणात सजून वैभवाचे प्रदर्शन मांडत स्वस्थानी विराजमान झाला. थोड्या वेळात नादिरशाहचा दरबारात प्रवेश झाला. त्याची वस्त्रे अत्यंत साधी होती. देहावर एकही आभूषण नव्हते. तो सामान्य सैनिकासारखाच दिसत होता. त्याच्या धिप्पाड देहयष्टीवर मात्र नजर ठरत नव्हती. चहेऱ्यावर आत्मविश्वाच्या तेजाची झळाळी होती. दरबारातील सरदार या नरशार्दुलाची भक्कम चाल पाहूनच गर्भळीत झाले. नादिरशाहचे स्वागत करायला खुद्द बादशाहही स्वतःच्या स्थानावरून उठून उभा राहिला. अत्यंत नम्रपणे त्याने नादिरशाहला आपल्याजवळ मांडलेल्या सिंहासनावर बसवले.

नादिरशाहच्या स्वागतासाठी जलसा ठेवण्यात आला होता. उत्तम गायन-वादन संपले आणि नृत्यासाठी रुपसुंदर नृत्यांगना हजर झाल्या. त्यांच्या नर्तनात अनोखी नजाकत होती. तोवर कार्यक्रम सुरू होऊन बराच वेळ लोटला होता. नादिरशाहला तहान लागली. त्याने तसे सांगताच बादशाहने सेवकांना इशारा केला. लगेच दहा-बारा दासी-बांदी नक्षीकाम केलेल्या सोन्याच्या सुंदर सुरयात विविध प्रकारची सरबते घेऊन धावल्या. प्रत्येक सुरईवर सुंदर कशीदा केलेली रेशमी वस्त्रे झाकली होती. नादिरशाहचा खाक्या सैनिकाचा! मोगली थाटमाट हे ध्येयच नसेल तर त्याची सवय कशी असणार? आपल्याला थंड पाणी हवे असताना, सरबत का देण्यात येत आहे, ते त्याला कळेना. तो बुचकळ्यात पडला. तरी साधेपणाने त्याने तहान लागल्याचे स्पष्ट केले.

"हुजूर, हे चवदार सरबत चाखाल तोवर पाण्याची व्यवस्था होईल" बादशाह नम्र स्वरात म्हणाला.

"काही तरीच काय? पाण्याची तहान सरबताने कशी भागेल? आणि पाण्याची व्यवस्था ती काय करायची? तहान लागताच पाणी पिता यावे." असे म्हणून नादिरशाहने त्याच्या माणसास खूण केली. लगेच भिस्ती पखाल घेऊन हजर झाला. पेला आणण्यासाठी मोगल सेवकांची धावपळ सुरू झाली. त्यांना थांबवून नादिरशाह पुढे म्हणाला, "पेल्याची गरज नाही. ती व्यवस्था माझ्याबरोबरच असते." कुणाला वाटले की तो खिशात पेला बाळगत असावा. पण नादिरशाहने मस्तकावरचा लोहटोप काढला नि भिस्त्यासमोर तोच उलटा धरला. भिस्त्याने लोहटोप कटोरा असल्यागत त्यात पखालीतील पाणी ओतले. लगेच नादिरशाहने तो टोप तोंडाला लावला. इतक्या साधेपणाने घटाघटा पाणी पिणाऱ्या नादिरशाहकडे सारा दरबार थक्क होऊन बघत राहिला.

"तहान लागली तर साधे पाणी हवे. ते पिण्यासाठी इतके नखरे कशाला?" पाणी पिऊन नादिरशाहने विचारले, "छोट्या-मोठ्या गोष्टींसाठी भपक्याचा आग्रह धरत नाही, म्हणून थेट इराणहून मी इथवर पोहोचू शकलो. भपक्याच्या मोहातून मुक्त झाला नाहीत तर पाहता पाहता तुमचे राज्य लयाला जाईल."

विजेत्याच्या तोंडचे हे निखळ सत्य मोगल दरबाराने एका कानाने ऐकून दुसऱ्या कानाने सोडून दिले. म्हणून तर पुढे काही वर्षात नादिरशाहच्या तोंडून उमटलेले मोगल साम्राज्याचे भाकित त्यांचा वर्तमान बनले. पाहता पाहता मोगल साम्राज्याचा अस्त झाला.

## ५४) अनोखा विचार.

एक होता फकीर. दिवसभर गावात परिभ्रमण करून तो लोकांच्या समस्या सोडवण्यास मदत करत असे. रात्री विसाव्यासाठी तो एका जुन्या पडीक मशिदीत झोपायला जाई. एके दिवशी मशिदीपासून बऱ्याच दूरच्या गरजूची समस्या सोडवण्यात त्याला मशिदीत पोहोचण्यास उशीर झाला आणि मशिदीचे दरवाजे बंद झाले. म्हणून त्याने दार ठोठावले. पण दार बंद करून मौलवी घरी निघून गेले होते. दरवाजा उघडणे शक्य नव्हते. फकीराने जरा जोराने दार ठोठावल्यामुळे, दरवाज्यालगतची जुनी भिंत कोसळली. आत जाण्याचा मार्ग आपसूक मोकळा झाला. फकीर शांतपणे आत गेला आणि निवांत झोपला.

सकाळ झाली. मौलवी आले तर भिंत पडलेली आणि फकीर निवांत झोपलेला, हे दृश्य नजरेस पडले. ते पाहून त्यांच्या तळपायाची आग मस्तकास भिडली. मशिदीचा दरवाजा बंद होता, म्हणून फकीराने भिंत फोडून मशिदीत प्रवेश केला, असा आक्रोश करत छाती पीटत ते सुलतानाकडे गेले. लगेच सुलतानाने फकीरास अटक केली. मशिदीसारख्या पवित्र स्थानाची तोडफोड केल्याचा आरोप ठेवून सुलतानाने त्यास देहांतदंड फरमावला. जात्या जिवाला शेवटची इच्छा विचारण्याचा रिवाज तिथेही होता. म्हणून सुलतानाने फकीरास इच्छा विचारली. यावर फकीराने मरतेवेळी दोन हात वर करण्याची परवानगी मागितली. ही विचित्र मागणी ऐकून सुलतान गोंधळला. फकीरास शिक्षेचे गांभीर्य लक्षात आले नसावे, असे समजून त्याने परत शिक्षेची भूमिका स्पष्ट केली, "असे केल्याने तुझे मरण टळणार नाही. मशिदीचा विध्वंस केल्याच्या गुन्ह्यासाठी मी तुला देहांतदंड दिला आहे."

"हुजूर मला मृत्यूचे भय नाही." फकीर शांतपणे म्हणाला, "इन्साननिर्मित मशिदीचा नकळत ध्वंस झाला असूनही त्या गुन्ह्यासाठी मला देहांतदंड झाला आहे, हे मी जाणतो. मला वाटते, हात वर केल्याने माझे हात आपसूक मिनारे बनतील आणि मस्तक मशिदीचा घुमट! अल्लातालानिर्मित या मशिदीचा हेतुपुरस्सर - संपूर्ण विचारांती ध्वंस करणाऱ्यास किती कडक सजा होईल याचा विचार तुम्ही करायचा, हे मला सूचवायचे आहे."

फकीराचे बोल ऐकून सुलतानाचे डोळे उघडले. पराचा कावळा करणाऱ्या मौलवीस कानपिचक्या देऊन त्याने परोपकारी फकीरास मुक्त केले.

## ५५) महानतेचा मापदंड.

एका जपानी सम्राटाच्या मनात सत्य जाणण्याची जिज्ञासा निर्माण झाली. जगातील सर्वश्रेष्ठ व्यक्तीकडून गुरुमंत्र घ्यावा, असे त्यास वाटले. म्हणून दरबार भरवून त्याने ही इच्छा व्यक्त केली. मंत्र्यांनी सांगितले, "शेजारच्या चीन देशात महान संत कॉन्फ्युशियस राहतात. त्यांच्या ज्ञानीपणाचा जगभर बोलबाला आहे. ते आपणास योग्य सल्ला देतील."

लगेच सम्राट लवाजम्यासह संताच्या भेटीस गेले. निसर्गसुंदर परीसरातला संताचा आश्रम पाहून, सम्राटांचे मन आपसूक प्रसन्न झाले. साधेपणाने स्वागत करून संतांनी एका स्वच्छ आसनावर बसण्याची सम्राटास विनंती केली. कुशल विचारण्याचा उपचार संपवून, सम्राटांनी भेटीचा हेतू सांगितला, "आपण खूप भ्रमण करता. खूप लोक आपल्या भेटीस येतात. म्हणून असंख्य महानुभावांशी आपण परिचित असाल. मला सांगा, मी शोधत आहे, अशी सर्वश्रेष्ठ व्यक्ती आपण पाहिली आहे का?"

संतांनी मानेने होकार दिला. त्यांच्या मुद्रेवर मंद स्मित विलसत होते. सम्राटांची नजर आपसूक प्रश्नार्थक बनली. "सम्राट, माझ्या मते तुम्ही महान आहात." संत उत्तरले. सम्राट गोंधळले. पण संताच्या स्वरात अभिनिवेष नसल्याचेही त्यांना जाणवले. म्हणून त्यांनी अधिक खुलासा मागीतला.

"मला का महान म्हणता? मी सम्राट आहे, म्हणून?"

"नाही, जगाच्या तख्तावर कित्येक सम्राट आले आणि काळाच्या ओघात वाहून गेले. त्यांना मी सामान्य माणसाहून जास्त समजत नाही. तुमच्या मनात सत्याविषयी जिज्ञासा आहे; म्हणून तुम्ही महान ठरता."

सम्राट विचारात पडले. स्वतः महान असून महानतेचा शोध घेणे कस्तुरीमृगासारखे अर्थहीन आहे का? असा प्रश्न त्यांच्या मनात उमटला. तो दडपून सम्राटांनी शांत स्वरात विचारले, "पण जगात माझ्यापेक्षा महान व्यक्ती असेल ना?"

"होय! तुमच्याहून मी महान आहे. कारण मी सत्याचा उपासक आहे. सत्याची उपासना ही महान शक्ती आहे." संताचा स्वर निराभिमानी असूनही सम्राटास त्यात दर्प जाणवला. तरी त्यांनी विचारणे चालू ठेवले.

"संतशिरोमणी, पृथ्वीस बहुरत्ना वसुंधरा म्हणतात. आपल्या दोघांव्यतिरीक्त महामानवांचे अस्तित्व अवश्य असेल. आपण सर्वात महान व्यक्तीची भेट घडवून आणू शकाल का?"

"अवश्य." संतांचे बोल ऐकून सम्राटांच्या आनंदास पारावार उरला नाही. लवाजम्यात उत्तम घोड्यांची व्यवस्था करण्याचा आदेश देण्यासाठी लगबगीने सम्राट उठले.

"राजन! त्या व्यक्तीची भेट घेणे अजिबात अवघड नाही. ती व्यक्ती फारशी दूर नाही. तिथवर पोहोचायला घोडेस्वारीची गरज नाही. चला, आपण चालत तिच्या दर्शनाला जाऊ."

सम्राट उत्साहाने संतामागे चालू लागले. आश्रमाच्या मागच्या बाजूस एक पर्णकुटी होती. संताने तिकडे हस्तनिर्देश केला. पर्णकुटीत निखळ शांतता होती. पण पर्णकुटीच्या मागील अंगणात एक वृद्धा नव्याने रोपलेल्या रोपास पाणी घालत असलेली सम्राटांना दिसली.

"या स्त्रीस आपण जगातील सर्वात महान व्यक्तीचा दर्जा कसा देता? कुणीही करू शकेल असे साधे - झाडास पाणी घालण्याचे काम ती करते आहे." सम्राटांच्या तोंडून आश्चर्य निसटले.

"सम्राट, ती हे काम अत्यंत मनापासून आणि आत्मीयतेने करते आहे. हे काम तुम्ही समजता तितके साधे नाही. ती ज्या रोपास पाणी घालते आहे तो वृक्ष फळू फुलू लागेतो ही वृद्धा जगणार नाही. म्हणजे या वृक्षाचा तिला काहीही उपयोग होणार नाही. तरी त्या रोपाचे संवर्धन ती मनापासून करते आहे. सम्राट, तुम्ही-आम्ही बोलाची कढी नि बोलाचाच भात रांधणारे सामान्य जीव! या वृद्धेपाशी खऱ्या अर्थाने कर्म करण्याचे कौशल्य आहे. विचार देणाऱ्यापेक्षा कर्माचा परिणाम सादर करणारा महान असतो. परिणामाचे फळ आपण भोगू शकणार नाही, हे खात्रीपूर्वक ठाऊक असूनही या कर्मास समर्पित असलेली ही वृद्धा जगातील सर्वश्रेष्ठ व्यक्ती आहे."

ज्ञानसंपन्न संत कॉन्फ्युशियसचे बोल सम्राटाच्या ह्रदयास हात घालणारे होते. सम्राटांनी मनापासून त्या वृद्धेच्या चरणी मस्तक ठेवले.

**५६) निस्पृह आईन्स्टाईन.**

आल्बर्ट आईन्स्टाईन एकदा विचारात हरवले असताना त्यांच्या मित्राचे आगमन झाले.

"जटिल समस्या उकलत नसल्यागत का दिसताहात?" मित्राने विचारले.

"समस्या जटिलच आहे," आईनस्टाईन उत्तरले, "इस्रायल सरकारचे मला पत्र आले आहे."

"पण त्यास समस्या नाव का देता?"

"भूतकाळात आपल्या यहुदी प्रजेने किती अत्याचार सहन केले आहेत, ते तुम्ही जाणता. इस्त्रायल स्वतंत्र राष्ट्र म्हणून प्रस्थापित व्हावे, यासाठी आपल्या बापजाद्यांनी रक्ताचे पाणी केले आहे. हे स्वप्न साकार करण्यात महत्वाची कामगिरी बजावलेल्या डॉ. चेइम वाइजमन यांचे निधन झाले आहे. त्या जागेवर - म्हणजे इस्राइलच्या अध्यक्षपदावर माझी नेमणूक करण्याची इच्छा व्यक्त करणारे हे पत्र आहे. माझ्याकडे संमतीपत्राची मागणी करणारे!"

"यात समस्याच नाही तर तुम्हाला ती जटिल कशी वाटते? सर्वार्थाने या जागेसाठी तुम्ही योग्य आहात. होकार कळवून मोकळे व्हा कसे!"

"पण मला हे काम माझे वाटत नाही." आईन्स्टाईन निरीच्छ स्वरात उत्तरले, "मोराची पिसे खोवून कावळ्याने मोराचा आव आणू नये. हे स्थान ग्रहण केल्यास माझी अवस्था या कावळ्यासारखी होईल."

"छे! स्वतःस कावळा का समजता? नीर-क्षीर विवेक जाणणारा तुमच्यासारखा अध्यक्ष प्राप्त होणे, राष्ट्राचे

भाग्य ठरेल." मित्राने आग्रह धरला.

"मित्रा, मी यहूदी आहे. राष्ट्रासाठी अपार आदर बाळगणारा! राष्ट्रासाठी प्राण अर्पण करण्याची माझी तयारी आहे. पण मी वैज्ञानिक आहे - राजकारणतज्ञ नाही, हे मी कसे विसरू? विज्ञान माझा श्वास-प्राण आणि प्रयोगशाळा मंदिर आहे माझे! प्रयोगात मग्न असताना मृत्यू आला तर मी स्वतःस भाग्यवान समजेन. माझे आराध्यदैवत विज्ञान आहे - राजकारण नाही."

अध्यक्षपदाचा इन्कार करणारे त्यांचे पत्र मिळाले आणि जनतेस दुःख झाले. पण दूरगामी विचारांती, अध्यक्षपदाचा स्वीकार करणे म्हणजे विज्ञानास आराध्यदैवत मानण्याच्या विचारास स्वतःच बेगडी ठरवणे होईल, हा विचार समाजास पटला. आईन्स्टाइनचा नकार, जनमानसातील त्यांची प्रतिमा अधिक उजळ करणारी ठरला.

## ५७) अर्थ जीवनाचा...

एक वृद्ध तरुण कार्यकर्त्यास सांगत होता, "तू नादान अननुभवी बालक आहेस. गेली कित्येक वर्षे मी या सभेस मार्गदर्शन करत आलो आहे. माझ्या अनुभवसंचितास तोड नाही. अशा वेळी सभेची सूत्रे तुझ्या हाती सोपणे, मूर्खपणा ठरेल, याचे भान मी ठेवायला हवे. अननुभवी तरुण व्यक्ती, हिरवटपणाच्या मोहात पोक्त विचारांचा अनादर करील आणि सत्यानाशास निमंत्रण धाडिल, याची मला जाणीव आहे. प्राण गेला तरी मी खुर्ची सोडणार नाही."

त्याचवेळी फांदीवर झोके घेणारे एक पिवळे पान, नव्याने फुटणाऱ्या पालवीशी सुखसंवाद साधत होते, "जगाचे - निसर्गाचे रागरंग अनुभवून मी तृप्त झालो आहे. निरोप घेण्याचा क्षण माझ्या नजरेच्या टप्प्यात आला आहे. जाण्यापूर्वी तुला अनुभवाचे बोल सांगावेसे वाटतात. तू निश्चिंत मनाने जीवनाचा उपभोग घे. खाली गवतावर पडल्या पडल्या मी समाधानाने तुझी हिरवीगर्द पाने फांद्यांवर डुलताना बघेन. मजेत रहा. वाट्यास आलेले आयुष्य जगून माझ्यासारखा कृतकृत्य मनाने जगाचा निरोप घे."

दुसऱ्याच क्षणी वाऱ्याची झुळूक आली आणि ते पिवळे पान फांदीवरून गळून खालच्या हिरवळीवर पडले. प्रेमाने त्याच्याकडे बघणाऱ्या पालवीच्या नजरेत, आदराची भावना हिंदकळत होती. पण... वृद्धाचा हट्टाग्रह असह्य झालेला तो तरुण, वृद्धाच्या श्वेतवर्णी केसांकडे बघत बाह्या सरसावत होता. त्याच्या कृद्ध नजरेत निखळ तिरस्कार होता.

वृद्धाच्या पांढऱ्या केसात, अनुभवाची समृद्धी होती तसाच अधिकार न सोडण्याचा हट्टाग्रह आणि अहंकार यांचा गुंताही होता.

पिवळ्या पानावर जीवनसंध्येचे स्वागत करणारा इतिहास अंकित झाला होता.

जीवन खऱ्या अर्थाने कुणाला कळले? कुणाला उमगले?